**CIAN HEALTHCARE LIMITED**
**(An ISO 9001:2015 & WHO GMP Certified Co.)**

**Corporate Office:**
Office No. 508-511, Sacred World, 5th Floor, Above Macdonald,
Vitthal Rao Shivarkar Road, Wanowrie, Pune – 411040
Email: enquiry@cian.co, cianhealthcare@yahoo.co.in
Web: **www.cian.co**

**Registered Office:**
Milkat No. 16431, Block No. 1 from South Side, C.S. No. 227/10 3B,
Harpale Park, Opp. Berger Paint, Phursungi, Tal. Haveli, Dist. Pune - 412 308,
(Maharashtra) INDIA. Tele-Fax.: +91-20-26982792

**Factory:**
Kh. No.: 248, Village Sisona, Bhagwanpur, Roorkee, Haridwar,
Pin - 247 661. Uttarakhand, Tel.: 1332 235352

**CIN:** L24233PN2003PLC017563

**Date:** 08/09/2022

**To,**
**The Manager**
**Listing Department**
**BSE Limited**
**P.J Towers, Dalal Street Fort**
**Mumbai 400001**

***BSE Scrip Code: 542678***

***BSE Scrip ID: CHCL***

**SUB: SUBMISSION OF NEWSPAPER ADVERTISEMENT ABOUT DISPATCH OF ANNUAL REPORT 2021-2022**

Dear Sir,

We are enclosing herewith a Published Notice of 19th Annual General Meeting, Remote e-Voting and Dispatched Notice of AGM in Newspaper.

And in this connection the Company is providing remote e-Voting facility to their Shareholders, the e-Voting period begins from Tuesday the 27th day of September, 2022 at 09:01 am and ends on Thursday the 29th day of September, 2022 at 05:00 pm.

Kindly take the above in your records.

Thanking You!

Yours Faithfully
***FOR CIAN HEALTHCARE LIMITED***
Munjaji Purbhaji Dhumal

Digitally signed by Munjaji Purbhaji Dhumal
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=fe052b428abdd00c4df958eef7b490221ce738cb06d8d596
7ca43dbea0a08520, postalCode=431605,
street=Sayal,Sayal,Nanded,Nanded,
pseudonym=d35d294221cb24eca02d673ab2c57c36, title=7730,
serialNumber=97fc311176711c50e4a8bfe57eb4795c0f713e6d100f
9bd04b918cd4a6173ffb, o=Personal, cn=Munjaji Purbhaji Dhumal
Date: 2022.09.08 11:06:25 +05'30'

***(MUNJAJI DHUMAL)***
***COMPANY SECRETARY AND***
***COMPLIANCE OFFICER***

# भाजप बारामतीचा गड काबीज करणार

## भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा दावा



बारामती तालुक्यातील काटेवाडीत भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्वागत करण्यात आले.

**लोकसत्ता वार्ताहर**

**बारामती :** ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या सुरक्षित समजल्या जाणाऱ्या बालेकिल्ल्यात विजयासाठी भारतीय जनता पक्षाने सहा सप्टेंबरला काटेवाडीतून श्रीगणेशा केला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बारामतीत येऊन भाजप कार्यकर्त्यांना प्रोसाहन देण्याबरोबरच बारामतीत विजयासाठीच आम्ही आलो आहोत, असा दावा केला.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बारामतीत माध्यमांशी संवाद साधताना ही माहिती दिली. या वेळी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आमदार राहुल कुल, आमदार गोपीचंद पडळकर, वासुदेव काळे, बाळासाहेब गावडे, अविनाश मोटे, दिलीप खैरे, पांडुरंग कचरे, सतीश फाळके आदी उपस्थित होते.

बावनकुळे म्हणाले, 'बारामतीत भाजप संघटना मजबूत होईल आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा हा गड उद्धवस्त होईल. गड हा कोणा एका व्यक्तीच्या मालकीचा नसतो. काळानुसार त्यामध्ये बदल होत असतो. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत बारामतीचा गड भाजप नक्कीच काबीज करेल'

'बारामतीसह राज्यातील सर्व जागांवर आम्ही निवडणूक लढणार आहोत. संघटना वाढविणे, पक्षाची ताकद वाढविणे, पक्षाचा उमेदवार निवडून आणणे, ही पक्षाची जबाबदारी आहे. बारामतीची जागा जिंकायची हा आमचा निश्चय आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि भाजप हे बारामतीची जागा कोणत्याही परिस्थितीत निवडून आणल्याशिवाय राहणार नाहीत' असे त्यांनी सांगितले.

### 'उमेदवार कोण, हे मोदी आणि शहा ठरवतील'

बारामतीत कोणाला उमेदवारी द्यायची, याबाबतचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा हे घेतील. आजवर झाली नाही, अशी लढत बारामती मतदारसंघात होईल, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.

'केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन या बारामती लोकसभा मतदार संघाच्या प्रभारी आहेत. पुढील दीड वर्षांत त्यांचे पाच ते सहावेळा प्रत्येकी तीन दिवसांचे दौरे होतील. केवळ घोषणाबाजी आणि चर्चा नव्हे; तर पक्ष संघटना मजबूत करून आजवरची सर्वात मोठी लढाई २०२४ ला लढून बारामती जिंकू' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

बारामतीत प्रत्येकाला यावेसे वाटते, असे बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या होत्या. या प्रश्नावर ते म्हणाले, 'सुळे काय म्हणाल्या ते मला माहीत नाही. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन बारामतीच्या दौऱ्यावर येत आहेत. खासदार सुळे त्यांना भेटू शकतात'

बारामतीसह देशातील चारशेपेक्षा अधिक लोकसभेच्या जागा भाजप जिंकेल. विधानसभा निवडणुकीत राज्यात दोनशेपेक्षा अधिक जागांचे उद्दिष्ट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी ठेवले असल्याची माहिती त्यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षाची मोट बांधली जात आहे. पवार यांना तो अधिकार आहे. प्रत्येकाला आपला पक्ष व संघटना वाढविण्याचा अधिकार असतो. राज्यात राष्ट्रवादी काँगेसचा इतिहास पाहिला, तर आठ जागांच्या पुढे हा पक्ष गेलेला नाही' अशी टीका त्यांनी केली. बारामती मतदारसंघातील ४५ टक्के जनता उपेक्षित आहे, असा आरोप त्यांनी केला.

# बारामतीचा गड सर करणे भाजपसाठी आव्हानात्मक ठरणार?

**लोकसत्ता प्रतिनिधी**

पुणे : दोन वर्षांनंतर होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठीची तयारी भारतीय जनता पक्षाने सुरू केली असून राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघावर लक्ष केंद्रित करण्यात आले असले, तरी बारामतीचा गड सर करणे भाजपसाठी आव्हानात्मक ठरणार आहे. सर्वसमावेशक चेहरा आणि तुल्यबळ उमेदवाराचा अभाव आणि मताधिक्याचे समीकरण सोडविणे हाच मुद्दा भाजपसाठी अडचणीचा ठरणार आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघातील आजवरची वाटचाल लक्षात घेता भारतीय जनता पक्षाने दोन वर्षे आधीपासून मोर्चेबांधणी सुरू केली आहे. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ बारामतीवर पवार कुटुंबीयांची सत्ता आहे. या सत्तेला सुरुंग लावण्यासाठी बारामती लोकसभा मतदारसंघाचा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे दौरा करणार आहेत. तसेच भाजपच्या अतिवरिष्ठ नेत्यांचेही भविष्यात दौरे होणार आहेत. त्यामुळे भाजपने बारामतीला दिलेले राजकीय महत्त्व अधोरेखित होत आहे. असे असले तरी केवळ दौरा करून बारामती लोकसभा मतदारसंघावर कब्जा करणे भाजपला सहज शक्य होणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात सन २०१४ आणि त्यानंतर २०१९ मध्ये झालेल्या निवडणुका चुरशीच्या झाल्या होत्या. त्यातही सन २०१४ मधील निवडणूक लक्षवेधी ठरली होती. मोदी लाटेमध्ये म्हणजे २०१४ मध्ये राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर हे भाजप पुरस्कृत उमेदवार होते. जानकर आणि विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्यात लढत झाली होती. या निवडणुकीत जानकर यांचा पराभव झाला तरी त्यांना या निवडणुकीत ४ लाख ४१ हजार मते मिळाली होती. सुप्रिया सुळे यांच्याविरोधात जानकर ६९ हजार मतांनी पराभूत झाले होते.

सन २०१९ च्या निवडणुकीत दौंडमधील कांचन कुल यांना भाजपने उमेदवारी दिली. या निवडणुकीत कुल यांना ५ लाख ३० हजार मते प्राप्त झाली. सन २०१४ च्या तुलनेत २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला मिळणारी मते वाढली असली, तरी सुप्रिया सुळे यांनी १ लाख ५३ हजार मताधिक्याने विजय मिळविला होता. त्यामुळे भाजपची मते वाढली असली, तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे विजयातील अंतरही वाढल्याचे स्पष्ट झाले होते.

बारामती लोकसभा मतदारसंघात खडकवासला (शहराचा काही भाग), पुरंदर, भोर, दौंड आणि इंदापूर या राष्ट्रवादी काँग्रेस विरोधातील मतदारसंघांचा समावेश आहे. गेल्या दोन्ही लोकसभा निवडणुकीत खडकवासला विधानसभा मतदारसंघात ६० हजारांपेक्षा अधिक मताधिक्य भाजपला मिळाले होते, ही वस्तुस्थिती आहे. याच दोन्ही निवडणुकीत दौंडमधून २०१४ मध्ये २८ हजारांचे, तर २०१९ मध्ये फक्त ८ हजारांचे मताधिक्य भाजपला मिळाले होते. पुरंदरमधून भाजपला २०१४ मध्ये पाच हजारांचे मताधिक्य होते. मात्र २०१९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला भाजपपेक्षा पाच हजार जास्त मते पुरंदरमधून मिळाली होती. भोर आणि इंदापूर तालुक्यात दोन्ही निवडणुकांमध्ये २० हजारांच्या आसपासचे मताधिक्य सुप्रिया सुळे यांना मिळाले होते. बारामती तालुक्यातून सुप्रिया सुळे यांना सर्वाधिक मतदान झाल्याने दोन्ही वेळा त्या विजयी झाल्या होत्या. त्यामुळे बारामती लोकसभा मतदारसंघावर लक्ष केंद्रित करताना मतांचे समीकरणही भाजपला सोडवावे लागणार आहे.

बदलती राजकीय परिस्थिती आणि पुरंदर, दौंड, इंदापूर आणि भोर या विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादीविरोधी परिस्थिती, तसेच बारामती लोकसभा मतदारसंघात येत असलेल्या शहरी भागातून भाजप उमेदवाराला होणारे मतदान या बाबींचा विचार करून आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला धोबीपछाड देता येईल, असा दावा भाजपच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे. मात्र भाजपचे वरिष्ठ नेते आणि पवार कुटुंबीयांची असलेली जवळीक, बारामतीमधील भाजपचे कमकुवत संघटन, सातत्याने उमेदवार बदलणे, मतदारसंघाबाहेरील उमेदवार निवडणुकीला देणे आणि निवडणुकीला काही दिवस बाकी असताना उमेदवाराच्या नावाची घोषणा करणे यामुळे भाजपला बारामतीचा गड सर करणे काही प्रमाणात अडचणीचे ठरणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने सहकाराचे विणलेले जाळे ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या जमेची बाजूही भाजप नेतृत्वाला विसरता येणार नाही. दौंड, इंदापूर, पुरंदर, खडकवासला विधानसभा मतदारसंघातून भाजप उमेदवाराला मोठ्या प्रमाणावर मतदान झाले, तरी एकट्या बारामती मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसला मिळणारे मताधिक्य तोडणे भाजपसाठी आव्हानात्मक ठरणार आहे. त्यामुळे भाजपसाठी मिशन बारामती आव्हानात्मक असणार आहे.

# मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री आज पुण्यात

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुधवारी (७ सप्टेंबर) पुणे दौऱ्यावर येणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शहरातील प्रमुख गणेश मंडळांना भेट देणार असून फडणवीस पुरंदर तालुक्यातील भिवडी येथील आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या जयंती सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

कसबा पेठ, त्वष्टा कासार, तरूण अशोक मंडळ, दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ, अखिल मंडई गणेशोत्सव मंडळ, तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, केसरीवाडा, यशवंतनगर गणेशोत्सव मंडळ, साई सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आदी गणेशमंडळांना एकनाथ शिंदे भेट देणार आहेत. अभिनेता नाना पाटेकर यांच्या निवासस्थानी जाऊन एकनाथ शिंदे गणेश दर्शन घेणार आहेत.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पुरंदर तालुक्यातील भिवडी येथील आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक स्मारकाला भेट देणार आहेत. त्यानंतर नाईक यांच्या जयंती सोहळ्यासही ते उपस्थित राहणार आहेत. एकनाथ शिंदे यांच्या पुणे दौऱ्यामुळे शिंदे गटाकडून जोरदार शक्तिप्रदर्शन होण्याची शक्यता आहे.


पुणे शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवाची ओळख म्हणजे वैविध्यपूर्ण गणेश मूर्ती. मार्केटयार्ड येथील शारदा-गजाननाच्या रुपातील ही लोभस मूर्ती गणेशभक्तांचे लक्ष वेधून घेते.

# उद्धव ठाकरे यांनी आता आदित्यची काळजी करावी - किरीट सोमय्या

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांचा उजवा हात आत गेला आहे, आता डावा हातही तुरुंगात जाणार आहे. आता उद्धव ठाकरे यांनी मुलगा आदित्य याची काळजी करावी, अशा शब्दांत भाजप नेते, माजी खासदार किरीट सोमय्या यांनी उद्धव ठाकरे यांना मंगळवारी येथे चुचकारले.

गणेशोत्सवानिमित्त किरीट सोमय्या यांनी मानाचा पहिला कसबा गणपतीसह अन्य काही मंडळांना मंगळवारी भेट दिली. कसबा गणपती मंदिराला भेट दिल्यानंतर सोमय्या पत्रकारांशी बोलत होते.

गेल्या वर्षी गणरायाला निरोप देताना मला अटक करण्याचा प्रयत्न झाला. अडीच वर्षानंतर राज्य पुन्हा विकासाच्या मार्गावर आले आहे. ज्या दिवशी ठाकरे सरकार गेले त्यादिवशी राज्यावरील अमंगल संपले. त्याबाबत गणरायाला धन्यवाद दिले. राज्याचा विकास झपाट्याने होऊ दे, अशी प्रार्थनाही गणरायाच्या चरणी केली असे सांगून सोमय्या म्हणाले की, उद्धव ठाकरे यांचा डावा हात तुरुंगात गेला आहे. आता डावा हात ही काही दिवसांत जाईल.

मुंबई महापालिकेने मड आयलंड घोटाळ्याच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. हा एक हजार कोटींचा घोटाळा आहे. पर्यावरण मंत्रालयाने त्याला नियमबाह्य परवानगी दिली होती. आदित्य ठाकरे आणि अस्लम भाई यांच्या मड आयलंडची चौकशी होणार आहे.

पर्यावरण खात्याने गैरव्यवहार केल्याने चौकशी होणार आहे. आदित्य ठाकरेंना अधिकार नसताना त्याला २१ नोव्हेंबर २०२१ला बेकायदेशीर परवानगी दिली. त्यामुळे आता उद्धव ठाकरे यांनी आदित्य यांची काळजी करावी, असे सोमय्या यांनी सांगितले.

# जिल्ह्यात १९३ जणांना नव्याने करोना संसर्ग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** मंगळवारी दिवसभरात जिल्ह्यातील १९३ जणांना करोना संसर्गाचे निदान झाले. राज्याच्या साथरोग सर्वेक्षण विभागाने याबाबत माहिती दिली. मात्र, बहुसंख्य करोना रुग्णांना सौम्य लक्षणे असून ते घरच्या घरी बरे होत असल्याने घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

मंगळवारी दिवसभरात आढळलेल्या १९३ नवीन रुग्णांपैकी ११२ रुग्ण पुणे महापालिका क्षेत्रातील आहेत. ४५ रुग्ण पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात, तर ३६ रुग्ण जिल्ह्याच्या उर्वरित भागात आढळले आहेत. संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी विशेषतः जोखीम गटातील रुग्ण, सहव्याधीग्रस्त आणि ज्येष्ठ नागरिकांनी तसेच लसीकरण न झालेल्या नागरिकांनी मुखपट्टी वापरासह सर्व आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

मंगळवारी आढळलेल्या १९३ नव्या रुग्णांमुळे पुणे जिल्ह्यातील एकूण करोना रुग्णसंख्या १४ लाख ९७ हजार ७९५ एवढी झाली आहे. जिल्ह्यातील १७३१ रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

# हिंदुराष्ट्र सेनेच्या तुषार हंबीर याच्यावर ससून रुग्णालयात हल्ला

## पोलीस कर्मचारी जखमी; हल्लेखोर पसार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** हिंदुराष्ट्र सेनेशी संबंधित असलेल्या तुषार हंबीर याच्यावर ससून रुग्णालयात शिरलेल्या हल्लेखोरांनी तीक्ष्ण शस्त्राने वार करून खून करण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना सोमवारी रात्री घडली. त्या वेळी बंदोबस्तावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याने प्रसंगावधान राखून हल्लेखोरांना रोखण्याचा प्रयत्न केला. या घटनेत पोलीस कर्मचारी जखमी झाला.

या प्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी हल्लेखोरांच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून पसार झालेल्या हल्लेखोराचा शोध घेण्यात येत आहे. हंबीर याच्याविरोधात खून, खुनाचा प्रयत्न, दहशत माजविणे, बेकायदा शस्त्र बाळगणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याच्या विरोधात हडपसर पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई केली. हंबीर आणि साथीदार येरवडा कारागृहात आहेत.

आजारी असलेल्या हंबीरला कारागृह प्रशासनाने २५ ऑगस्ट रोजी ससून रुग्णालयात दाखल केले. सोमवारी (५ सप्टेंबर) रात्री पावणेदहाच्या सुमारास तीन ते चार हल्लेखोर ससून रुग्णालयात शिरले. ससून रुग्णालयातील कक्षात हंबीरवर उपचार सुरू आहेत. हल्लेखोरांनी हंबीरला मारण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी ससून रुग्णालयात बंदोबस्तात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याने प्रसंगावधान राखून हल्लेखोरांना प्रतिकार केला. झटापटीत पोलीस कर्मचारी जखमी झाला. त्यानंतर हल्लेखोर रुग्णालयातून पसार झाले.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त सागर पाटील, बंडगार्डन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रताप मानकर यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या हल्लेखोरांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# जिल्ह्यातील सरकार बदलले असे वाटत नाही

## हर्षवर्धन पाटील यांची खंत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यातील सरकार बदलले असले तरी जिल्ह्यातील सरकार बदलले असे वाटत नाही. त्यामुळे हा विषय गांभीर्याने घ्यावा लागणार आहे, अशा शब्दांत माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यापुढे मंगळवारी खंत व्यक्त केली.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बारामती लोकसभा मतदारसंघाला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन भेट देणार आहेत. या दौऱ्याच्या निमित्ताने भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बारामतीमध्ये येऊन आढावा घेतला. त्यावेळी हर्षवर्धन पाटील बोलत होते.

पाटील म्हणाले की, राज्यातील सत्ता बदलली आहे. मात्र जिल्ह्यातील सरकार बदलले आहे, असे दिसत नाही. हा विषय गांभीर्याने कसा घ्यायचा, हे या मोठ्या व्यासपीठावर सांगण्याची आवश्यकता नाही. गेल्या अडीच वर्षात भाजप कार्यकर्त्यांनी साधा अर्ज दिला तरी तो फेकून दिला जायचा. आता विरोधी पक्षातील लोक रात्री-अपरात्री भाजप नेत्यांना भेटत आहेत. मी तुमचाच आहे, असे त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे. आमची कामे करा, असे ते सांगत आहेत. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी भाजप नेत्यांना भेटू नये, असे नाही. मात्र यापुढे राजकारण करताना दक्ष रहावे लागणार आहे.

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बारामती लोकसभा मतदारसंघात विजय मिळवायचा असेल तर काही गोष्टी कराव्या लागतील. बूथ पातळीपर्यंत काम करावे लागणार आहे. बऱ्याचदा अनेक तालुक्यात यंत्रणा सक्षम नाही. शेवटच्या काही दिवसांत कार्यकर्ते कमी पडतात. त्यामुळे बूथनिहाय पक्ष संघटन मजबूत करावे लागणार आहे, असे पाटील यांनी सांगितले.

# पीएच.डी. प्रवेश परीक्षा वेळापत्रकाची प्रतीक्षा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी पीएच.डी. प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय केंद्राने प्रसिद्ध केले. मात्र, विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाकडून स्थानिक विद्यार्थ्यांसाठी पेट परीक्षेचे वेळापत्रक जाहीर होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे पीएच.डी. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना पेट परीक्षेच्या वेळापत्रकाची प्रतीक्षा करावी लागत आहे.

आंतरराष्ट्रीय केंद्राकडून आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षा आणि मुलाखत हे दोन टप्पे पूर्ण करून प्रवेश दिला जाईल. इच्छुक विद्यार्थ्यांना २० सप्टेंबरपर्यंत विद्यापीठाच्या संकेतस्थळाद्वारे ऑनलाइन अर्ज करावा लागेल, तर ३० सप्टेंबरला ऑनलाइन परीक्षा होईल. मात्र, त्याचवेळी पीएच.डी. अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी उत्सुक स्थानिक विद्यार्थ्यांसाठी पेट परीक्षा कधी होणार हा प्रश्न आहे. विद्यापीठ प्रशासनाने केवळ पीएच.डी.साठी रिक्त जागांची माहिती मार्गदर्शकांकडे मागवली होती. मात्र ही माहिती मार्गदर्शकांनी सादर न केल्याने सात दिवसांची मुदतवाढ देण्यात आली. पेट परीक्षेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया ऑगस्टमध्ये सुरू करण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठाने जुलैमध्ये दिली होती. आता सप्टेंबर सुरू झाला तरी विद्यापीठाने वेळापत्रक जाहीर केलेले नाही. त्यामुळे विद्यापीठाला पेटच्या आयोजनाचा विसर पडला का, असा प्रश्न विद्यार्थ्यांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

MBBS IN RUSSIA
A. K. EDUCATIONAL CONSULTANTS
(REG. BY RUSSIAN MEDICAL UNIVERSITIES NETWORK)
• NMC, WHO LISTED GOVT. UNIVERSITIES
• OUR RESULT SPEAK WHY WE ARE BEST IN MAHARASHTRA
Eligibility: 50% HSc PCB, NEET Qualified
CLEARED FMGE SCREENING TEST IN FIRST ATTEMPT
2021 DR. BHAVNA B. | 2020 DR. ANMOL D. | 2019 DR. SUNNY B.
2018 DR. PURVA B. | 2017 DR. CHATURBHUJ K. | 2016 DR. RASHMI S.
2015 DR. JENCY P. | 2014 DR. MILIND S. | 2013 DR. RANJIT P.
Dr. Amit Kamle, M.D (Russia): 7745887555 | 8856970277
INFORMATION CENTRE'S ALL ACROSS MAHARASHTRA
www.akecindia.com /akecindia /akecindiaofficial

**CIAN HEALTHCARE LIMITED**
Add: MILKAT NO.3339, BLOCK NO.1, FROM SOUTH SIDE, C.S. NO. 227/2+3A, HARPALE PARK, OPP. BERGER PAINT, PHURSUNGI PUNE MH 412308 IN

**NOTICE OF AGM, REMOTE E-VOTING AND DISPATCH OF NOTICE**

**NOTICE** is hereby given that 19th **ANNUAL GENERAL MEETING (AGM)** FOR FY 2021-22 of the members of **CIAN HEALTHCARE LIMITED** will be held on Friday 30th day of September, 2022 at 09:00 am, at registered office situated at Milkat No.3339, Block No.1, Harpale Park, Opp. Berger Paint, Phursungi Pune, Maharashtra 412308 India to transact the business as set out in AGM Notice.

Further Notice is hereby given that:
(ii) The Company is providing remote e-Voting facility to its member holding shares on September 23rd, 2022 being cut-off date to exercise their vote through electronic means.
(ii) Remote e-Voting commence on Tuesday September 27th, 2022 (09:01) am and ends on Thursday September 29th, 2022 (05:00) pm. And e-Voting shall not be allowed beyond 05:00 pm.
(iii) The Company has engaged National Securities Depository Limited (NSDL) to provide remote e-voting facility and facility for voting through ballot paper shall be made available at the AGM.
(iv) Any person who acquire shares and becomes a member of the Company after dispatch of the Notice and holding shares as on cut-off date, can do remote e-Voting as provided in by obtaining User ID and password by sending mail to evoting@nsdl.co.in or saritaMnsdl.co.in. However if such shareholder is already registered with NSDL for remote e-Voting then existing user id and password can be used for casting your vote.
(v) The Notice of AGM is also available on website of company www.cian.co and on NSDL www.e-voting.nsdl.com.
(vi) No physical copy of Annual Report is send to shareholders, which is available at website of Company www.cian.co.
(vii) The Member who have cast their vote by remote e-voting prior the AGM may also attend the AGM but shall not be entitled to cast their vote again.
(viii) A person whose name is recorded in the register of members or in register of beneficial owners maintained by the depositories as on the cut-off date shall only be entitled to avail the facility of remote e-voting as well as voting in AGM.
(ix) Notice of AGM has been dispatched by post or e-mail to all the respective shareholders at their registered address.
(x) In case you have queries or issue regarding e-voting you may contact Mrs. Sarita Mote Assistant Manager, 4th Floor, "A" Wing, Trade World, Kamala Mills Compound, Senapati Bapat Marg, Lower Parel Mumbai 400 013 sagargnsdl@gmail.com : IN Tel: 022-24994200/4545.

Date : 06/09/2022
Place: Pune

By order of the Board
Munjaji Dhumal
Company Secretary

On the Occasion of Dussara Special Presenting
Presents
Weaves INDIA
An exposition of handloom textiles
An opulent show of Ethnic & Traditional Silk, Cotton Handloom Products made by master 100 Weavers from all over India
Silk Saree | Suits | Dress Material | Stoles | Dupattas | Kurtas
Kurties | Pure & Probable Silk | Tussar Silk | Shanthipur Silk
SONAL HALL
19- Karve Road, Near Garware College, Pune
From : 02nd to 11th Sep. 2022
Products on Display - Orissa : Sambhalpuri Ikkat Silk Saree, Bihar : Oragnic Tassar Silk Sarees, Suit & Stoles, Assam : Muga & Eri Silk Sarees, Karnataka : Creap Silk, Georgette Silk, Arini Silk & Printed Sarees, Tamilnadu : Kanjeevaram Silk Sarees & Designer Fancy Sarees, Andra Pradesh : Dharmavara, Uppada, Gadwal, Mangalagiri & Pochampalli Sarees, Uttar Pradesh : Mulbari Silk, Jamdani, Jamawar Silk Sarees & Chiffon Silk, Maharashtra : Designer Dress materials, Chhatisgarh : Exclusive Raw Silk Sarees, Kosa Silk, Tassar Suit & Duppatta, Madhya Pradesh : Maheswari, Chanderi Silk Sarees & Suit, West Bengal : Baluchari, Dhaka Masli, Gicha Sarees, Boutique Sarees, Kantha Sarees, Zordoshi, Jammu & Kashmir : Chinon Silk, Tady Silk Printed Sarees, Pashmina Shawls & Suit, Rajasthan : Kota Silk, Hand Block Print Dress & Sarees, Punjab : Fulkari Dress and many more...
5 Days Only
Don't Miss it!
Time : 10.30 am - 8.30 pm Call: 09411650346
All Credit & Debit Cards Accepted
Entry & Parking Free